महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ७०९५ दि.- ५/१/२०२४

## अपिलाची सुनावणी

(अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – ०४ / ०१ /२०२४ दिनांक – दुपारी १.०० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

प्रति,

**श्री योगेश रघुनाथ पवार**
**४०६ ढोलेमळा सहकारी सोसायटी,**
**गुलटेकडी, पुणे – ४११०३७** } अपिलार्थी

श्री जयदीप अडसूळ
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री योगेश पवार माहिती अधिकारातीलयांचा मा (लार्थी म्हणून संबोधिले जातीलयापुढे अपि) २९ /१२ /२०२३ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र.९२९२दि. २९ /१२ /२०२३ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

**माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील**

| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| २९ /११ /२०२३ | आ क्र ८४०४<br>०६ /१० /२०२३ | २९ /१२ /२०२३ | जा क्र – ६३००<br>१२ /१२ /२०२३ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती देण्यात आलेली आहे.त्यांना माहितीचे समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी त्यांचा अपिल अर्ज दिनांक २९ /१२ /२०२३ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला.

**अपिल अर्जाचा तपशील**

| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| २९ /१२ /२०२३ | २९ /१२ /२०२३ | अपिल अर्ज मुदतीत आहे |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि. ०४ /०१ /२०२४ रोजी दुपारी १.०० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –**

| अ.क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | सी सी टीव्ही फुटेज मिळणेबाबत प्रभाग क्र २८ सॅलिसबरी पार्क, संदेशनगर येथील क्रीडा संकुलातील तळ मजला व इतर मोकळ्या जागेतील दि. २४/११/२०२३ रोजीचे रात्री १०.०० पासून रात्री १२.३० पर्यंत व २५/११/२०२३ रोजी संध्याकाळी ०५.०० ते रात्री ०१.०० वाजे पर्यंतचे फुटेज तत्काळ देण्यात यावे. | पुणे महानगरपालिकेच्या धोरणानुसार महानगरपालिकेमार्फत बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे संबंधित पोलीस चौकी अथवा स्टेशन यांच्या अधिपत्याखाली येत असल्याने आपण केलेले सीसीटीव्ही फुटेज ची मागणी हि तपास यंत्रणेचा भाग तसेच सुरक्षा करता असल्याने संबधित पोलीस चौकी अथवा स्टेशन यांचे मागणी पत्रानुसारच सीसीटीव्ही फुटेज देता येणे शक्य होणार आहे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०४/०१/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री योगेश पवार हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्रीजयदीप अडसूळ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्री.सागर कांबळे सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय, उपस्थित होते.

अपिलार्थी श्री योगेश पवार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती अपिलार्थी यांना माहितीचे समाधान न झाल्याने अपिल अर्ज दाखल केला असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारीयांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'**</u>

पुढील प्रमाणे पारित आदेशानुसार,जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस चौकी अथवा पोलीस स्टेशन यांना संबधित माहिती बाबत पत्र देऊन अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती संकलित करून अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली आवश्यक माहिती पंधरा दिवसात विनामुल्य देण्यात यावी सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

Received ढलोडया
5/1/24

( प्रदीप आव्हाड )
**अपिलीय अधिकारी तथा**
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्याल
पुणे महानगपालिका

**टिप –**

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.orgया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री जयदीप अडसूळ,जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय,पुणे महानगरपालिका
२. श्री.सागर कांबळे सहा.जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.